# कवयित्री बहिणाबाई चौधरी उत्तर महाराष्ट्र विद्यापीठ,जळगाव

जा.क्र.:-कबचौउमवि/१६/ई-मेल/२०२५ दि. २८ ऑक्टो, २०२५

जळगाव दि.१८ ( प्रतिनिधी) : कवयित्री बहिणाबाई चौधरी उत्तर महाराष्ट्र विद्यापीठात आयोजित करण्यात आलेल्या एकविसाव्या महाराष्ट्र राज्य आंतरविद्यापीठ युवक महोत्सव इंद्रधनुष्य २०२५ स्पर्धेच्या लोगोचे अनावरण कुलगुरु प्रा.व्ही.एल.माहेश्वरी यांच्या हस्ते आज दि. २८ ऑक्टोबर रोजी विद्यापीठात करण्यात आले.

यावेळी प्र-कुलगुरु प्रा.एस.टी.इंगळे, राज्यपाल नियुक्त व्यवस्थापन परीषद सदस्य राजेंद्र नन्नवरे, व्य.प.सदस्य नितीन झाल्टे, कुलसचिव डॉ.विनोद पाटील, वित्त व लेखा अधिकारी सीए रवींद्र पाटील, विद्यार्थी विकास संचालक डॉ. जयेंद्र लेकुरवाळे, प्रा.राम भावसार, प्रा.उज्वल पाटील, उपवित्तलेखाधिकारी एस. आर. गोहिल हे उपस्थित होते. या लोगोची संकल्पना राज्यपाल नियुक्त व्यवस्थापन परीषद सदस्य राजेंद्र नन्नवरे यांची आहे. त्याअनुषंगाने हा लोगो तयार करण्यात आला आहे. राज्यातील युवकांच्या सर्वांगीण विकासाच्या दृष्टीने मा. राज्यपाल महोदयांनी आंतरविद्यापीठ स्तरावर इंद्रधनुष्य ही कला व सांस्कृतिक स्पर्धा सुरु केली आहे.

---

प्रति,

मा.संपादक/प्रतिनिधी,

महोदय,

उपरोक्त बातमीस आपल्या लोकप्रिय दैनिकातून प्रसिध्द करावी, ही विनंती.

आपला विश्वासू

जनंसपर्क अधिकारी करीता

जळगाव, दि. २८ ऑक्टोबरः कवयित्री बहिणाबाई चौधरी उत्तर महाराष्ट्र विद्यापीठांतर्गत केबीसीएनएमयू सेंटर फॉर इमोशन इन्क्युबेशन अँण्ड लिंकेजेस (KCIIL) आणि राजीव गांधी विज्ञान आणि तंत्रज्ञान आयोग, मुंबई पुरस्कृत सिलेज आधारित क्षेत्र विकास कार्यक्रम (सीएडीपी), नंदुरबार याच्या संयुक्त विद्यमाने आदिवासी युवक-युवतींसाठी राबविण्यात येत असलेल्या आदिशक्ती या विशेष इनक्युबेशन कार्यक्रमाच्या माहितीपत्रकाचे अनावरण आज कुलगुरू व्ही. एल. माहेश्वरी यांच्या हस्ते करण्यात आले.

याप्रसंगी बोलताना कुलगुरू यांनी या उपक्रमाचे कौतुक केले ते म्हणाले, "आपल्या भागातील आदिवासी बांधवांमध्ये प्रचंड ऊर्जा आणि नवनवीन कल्पना आहेत, 'आदिशक्ती' उपक्रमाच्या माध्यमातून या युवकांना उद्योजकतेच्या मुख्य प्रवाहात आणण्याचा KCIIL व CADF यांचा हा प्रयत्न अतिशय स्तुत्य आहे. या उपक्रमामुळे एक नवी उद्योजक पिढी घडेल आणि विद्यापीठ या उपक्रमाला सर्वतोपरी सहकार्य करेल."

सिलेज आधारित क्षेत्र विकास प्रकल्पाचे प्रमुख अन्वेषक प्रा. के. एस. विश्वकर्मा यांनी मत मांडले की, "हा कार्यक्रम आदिवासी युवक-युवतींसाठी एक नवीन मंच उपलब्ध करून देईल व त्यांच्या नाविन्यपूर्ण कल्पनांना उद्योगभिमुख बनविण्याचा महत्त्वाकांक्षी ठरेल."

KCIIL चे मुख्य कार्यकारी अधिकारी डॉ. नविन खंडारे यांनी 'आदिशक्ती' उपक्रमामागील भूमिका स्पष्ट केली. ते म्हणाले, "आदिवासी भागातील नवकल्पनांना (Innovations) शोधून त्यांना इनक्युबेशनच्या माध्यमातून मार्गदर्शन करून एक यशस्वी स्टार्टअप म्हणून उभे करणे, हा या कार्यक्रमाचा मुख्य उद्देश आहे. या माहितीपत्रकाद्वारे आम्ही जास्तीत जास्त युवकांपर्यंत पोहोचू शकतो."

याप्रसंगी KCIIL संचालक मंडळ सदस्य डॉ. राजेश जावळेकर, डॉ. आशुतोष पाटील, डॉ. अरुण इंगळे, सीए रवींद्र पाटील, सीएडीपी प्रकल्पाचे सह-प्रमुख अन्वेषक डॉ. जे. पी. बंगे तसेच केसीआयआयएलचे पोर्टफोलिओ व्यवस्थापक योगेश पाटील, कार्यक्रम समन्वयक रोशनी जैन व इतर कर्मचारी उपस्थित होते, या माहितीपत्रकाद्वारे 'आदिशक्ती' उपक्रमाची सविस्तर माहिती आदिवासी युवकांपर्यंत पोहोचवली जाणार आहे.

**बातमी नं. २**

जळगाव, दि. २८ ऑक्टोबरः कवयित्री बहिणाबाई चौधरी उत्तर महाराष्ट्र विद्यापीठाच्या गणितशास्त्र प्रशाळेतील सांख्यिकी विभागात “जागतिक सांख्यिकी दिन २०२५” उत्साहात साजरा करण्यात आला. जागतिक सांख्यिकी दिन दर पाच वर्षांनी २० ऑक्टोबर रोजी साजरा केला जातो. यावर्षीच्या जागतिक सांख्यिकी दिनाचा मुख्य विषय *“Quality Statistics and Data for Everyone”* आहे. हा कार्यक्रम ऑनलाइन पद्धतीने (Microsoft Teams) दि. २७ ऑक्टोबर २०२५ रोजी स.१०.३० वाजता आयोजित करण्यात आला.

मुख्य विषयाला अनुसरून सांख्यिकी विभागातर्फे कथाकथन (Storytelling) आणि सांख्यिकी व्यंगचित्र (Statistical Meme Competition) स्पर्धांचे आयोजन करण्यात आले. कार्यक्रमात विभागातील पदवी आणि पदव्युत्तर विद्यार्थ्यांनी “कथाकथन (Storytelling)” या स्पर्धेत सहभाग घेतला. प्रत्येक विद्यार्थ्याने ४ ते ५ मिनिटांच्या सादरीकरणातून आकडेवारीच्या आधारे एक गोष्ट सांगितली. सादरीकरणात आकडेवारीचा वापर, विश्लेषण आणि दृश्य मांडणी यावर भर देण्यात आला. “सांख्यिकी व्यंगचित्र” स्पर्धा कार्यक्रमाचे आणखी एक आकर्षण होते. विद्यार्थ्यांनी सांख्यिकी, डेटा विश्लेषण आणि संशोधनातील विनोदी अंग उलगडणारे स्वतः तयार केलेले व्यंगचित्र सादर केले. या स्पर्धेतून विद्यार्थ्यांच्या सर्जनशीलतेला चालना मिळाली.

कथाकथन ही स्पर्धा प्रा. डॉ. रोहन कोष्टी यांनी संचलित केली तर प्रा. रामकृष्ण शिंदे यांनी परीक्षक म्हणून काम पाहिले . तर सांख्यिकी व्यंगचित्र स्पर्धा प्रा. मनोज पाटील यांनी संचलित केली तर प्रा. किर्ती कमळजा आणि प्रा. रोहन कोष्टी यांनी

परीक्षक म्हणून काम पाहिले. कार्यक्रमाचे स्वागत व सूत्रसंचालन कल्याणी सोनवणे यांनी केले. कार्यक्रमाच्या यशस्वी आयोजनासाठी चंचल काबरा, विनय देसले, विवेक पाटील,मानसी देशमुख , रिया जैन यांनी सहकार्य केले. स्पर्धेतील प्रत्येक सहभागीला प्रमाणपत्र आणि प्रथम तीन विजेत्यांना पारितोषिके देण्यात आली.

स्पर्धेतील विजेते पुढीलप्रमाणे आहेत :कथाकथन (Storytelling) या स्पर्धेत B.Sc. प्रवर्गातून भाग्यश्री सवांदे (प्रथम), दीपिका तिलवणे (द्वितीय ), देवयानी पाटील (तृतीय) आणि M.Sc. प्रवर्गातून राजश्री पाटील (प्रथम), नितीनकुमार परदेशी (द्वितीय), विनय पाटील(तृतीय) यांना पारितोषिके मिळाले.

सांख्यिकी व्यंगचित्र (Statistical Meme Competition) या स्पर्धेत B.Sc. प्रवर्गातून रोहित पाटील (प्रथम), वैश्नवी सोनार (द्वितीय), मोक्षदा पाटील (**तृतीय**) यांनी तर M.Sc. प्रवर्गातून तृप्ती पाटील ( प्रथम), नितीनकुमार परदेशी (द्वितीय), महेश्वरी पाटील(**तृतीय**) यांना पारितोषिके मिळाले.

---

जा.क्र.:-कबचौउमवि/१६/ई-मेल/बातमी/२०२५ दिनांक:२८ ऑक्टोबर, २०२५

प्रति,

मा.संपादक/प्रतिनिधी,

कृपया, उपरोक्त बातमीस आपल्या लोकप्रिय दैनिकातून प्रसिध्द करावी, ही विनंती.

आपला विश्वासू

जनसंपर्क अधिकारी करीता